
येवगेनी चारूशिन



# माझे पहिले प्राणिशास्त्र

06-Jul-13 / 02:34:15



06-Jul-13 / 02:34:18



येवगेनी चारूशिन

# माझे पहिले प्राणिशास्त्र

चित्रकार: निकिता चारूशिन
अनुवाद: अनिल हवालदार

06-Jul-13 / 02:34:20

रादुगा प्रकाशन
मॉस्को



# उष्ण आणि थंड देशांमधील प्राणी



06-Jul-13 / 02:34:23



06-Jul-13 / 02:34:24



## सिंह

सांभाळा, झेब्रांनो – पट्टेदार घोडयांनो! वेगवान काळवीटांनो, सांभाळा! बाकडया शिंगांच्या रानटी बैलांनो, सांभाळा!

सिंह शिकारीला बाहेर पडलाय!

जणू मेघगर्जना झाली व झाडा-झुडुपांमधून घुमली. ही सिंहगर्जना, हे सिंहाचे ओरडणे. सगळे प्राणी लपले.

सिंह सर्वांत ताकदवान आहे, सर्वांत भयंकर आहे. त्याची आयाळ दाट आहे, नख्या तीक्ष्ण आहेत, दात बळकट आहेत.

ह्या रात्री तो कुणाला पकडेल?

06-Jul-13 / 02:34:26



## पेंग्विन

हे फार आश्चर्यकारक पक्षी आहेत – इतर पक्ष्यांपेक्षा अगदी वेगळे. ते हवेत उडत नाहीत, तर पाण्यात उडतात. पाण्यात बुडी मारून आखूड पंखांची ते एवढ्या जोराने फडफड करतात, पाण्यामधून एवढ्या वेगाने उडतात की, माशांना गाठून मागे टाकतात. पेंग्विन चालतातसुद्धा खास स्वतःच्या चालीने: ताठ खांबाप्रमाणे. लांबून भासते की, काळ्या कोटातील व पांढऱ्या बंडीतील माणूस येतोय.

06-Jul-13 / 02:34:27



एकदा एक गलबत अज्ञात बर्फाळ प्रदेशात गेले. खलाशी किनाऱ्यावर उतरू इच्छित होते, पण एकदम त्यांनी पाहिले: बर्फावर आखीव लष्करी सेना उभी होती. जहाज किनाऱ्याच्या आणखी जवळ गेले. लष्करी सेनेने जणू हुकूम मिळाल्याप्रमाणे डोकी खाली करून पाण्यात उड्या मारल्या! तेव्हा कुठे खलाशांच्या ध्यानात आले की, ती माणसे नव्हती, तर ते पक्षी होते.

06-Jul-13 / 02:34:28

## देवमासा

देवमासा हा जगातील सर्वात मोठा प्राणी आहे. तो समुद्रात राहतो, माशाप्रमाणे पाण्यात पोहतो.

देवमासा बर्फाळ थंड समुद्रात पोहत जातो, त्याचप्रमाणे बाराही महिने उष्णता असलेल्या दक्षिणेकडील समुद्रातही पोहत जातो. माशांच्या कळपांचा तो पाठलाग करतो. जेथे मासे तेथे तो.

माशांच्या आल्ल्या कळपाला देवमासा पाण्यासकट तोंडात घेतो, पाणी सोडून देतो आणि मासे त्याच्या मिशां-मध्ये अडकतात. मात्र ह्या खरोखरच मिशा आहेत असे समजू नको. देवमाशाच्या तोंडात जाळीप्रमाणे दातांच्या दोन रांगा असतात आणि त्यांना देवमाशाच्या मिशा म्हणतात.



06-Jul-13 / 02:34:30



06-Jul-13 / 02:34:31

# हत्ती


रानात काटकी मोडल्याचा आवाज झाला नाही, झाडाचे एकही पान हलले नाही – दाट जंगलामधून मुळीच चाहूल न देता महाप्रचंड जंगली हत्ती बाहेर पडला.

हत्ती उभा असला म्हणजे राखी टेकडी उभी असल्याप्रमाणे भासते: पाय झाडाच्या बुंध्याप्रमाणे, कान दोन शिडां-प्रमाणे, लांब सुळे बाकदार आणि भक्कम. हत्तीने सोंड ताणली, जमिनीवरचे झुडुप उचकटले, आख्खेच्या आख्खे तोंडात कोंबले व तो चघळू लागला.


हा प्रचंड सामर्थ्यवान प्राणी कुणालाही भीत नाही, त्याला कुणीही भयंकर वाटत नाही.



06-Jul-13 / 02:34:32



06-Jul-13 / 02:34:33



## अजगर

मोकळ्या मैदानात एक खूप जुना वृक्ष उभा आहे. वृक्षाची मुळे जमिनीतून बाहेर डोकावत आहेत, जाड फांद्या वाकड्या बनल्यात, त्यांचे एकमेकींना विळखे पडलेत.

एका फांदीने तर बुंध्याभोवती सापाप्रमाणे अनेक वेटोळी घातली आहेत. ती खरेच फांदी नाही, तर तो अस्सल साप आहे – ताकदवान आणि भयंकर अजगर.

सावध हरणाने वृक्षाजवळून जाऊ नये, छोट्या जनावराने धावू नये, पक्ष्याने वृक्षावर बसू नये – भक्ष्याभोवती अजगराचा एकदम विळखा बसेल आणि तो भक्ष्याल [illegible]

06-Jul-13 / 02:34:35



## काकाकुवा

काकाकुवा रानात झाडावर बसलाय आणि स्वतःच्या तुऱ्याशी खेळतोय : कधी मिटतो, कधी उलगडतो. वेगवेगळ्या आवाजांमध्ये ओरडतो, सर्वांची नक्कल करतो. कधी झुडुपात लपलेल्या रानडुकराप्रमाणे डुरकतो, कधी गुंफेतील पशूप्रमाणे गुरगुरतो, तर कधी सारिकेप्रमाणे शीळ घालतो. काकाकुवा असा टवाळखोर आहे!

काकाकुव्याला माणसाप्रमाणे बोलायलाही शिकविता येते : रशियन, फ्रेंच अथवा इतर कुठल्याही भाषेत. फक्त आपण काय बोलतोय ह्याचा अर्थ त्याला समजत नाही.

गाणीसुद्धा गाऊ शकणारा एक काकाकुवा माझ्या माहितीचा होता.

06-Jul-13 / 02:34:36



## पाणघोडा

पाणघोडा स्वतःच्या तोकड्या खुंटासारख्या पायांवर जेमतेम चालू शकतो. त्याच्या अंगावर चरबीच्या वळकट्या पडतात. हा ढोल्या खादाड कुरणात आला म्हणजे सारे कुरण खाऊन फस्त करतो आणि जे खाऊ शकत नाही ते चिरडून टाकतो. मग नदीत झोपायला जातो. मऊ परांच्या गादीवर झोपावे तसा तो पाण्यात आरामात झोपतो. झोप झाली, विश्रांती मिळाली – म्हणजे गंमती करायला सुरुवात. पाण्यात तो मुळीच अजागळ नाही, तर खूप चपळ जनावर आहे. पोहतो, डुबक्या मारतो, पाण्याच्या तळाच्या वनस्पती तोडतो आणि उघड्या प्रचंड सूटकेसप्रमाणे भासणारा स्वतःचा जबडा उघडतो व असा ओरडतो, जणू एकाच वेळी दहा घोडे खिंकाळताहेत.

06-Jul-13 / 02:34:37



06-Jul-13 / 02:34:38

## ओरांगउटांग


हे मोठे तांबूस केसांचे माकड म्हणजे ओरांगउटांग. मलायी भाषेत ओरांगउटांग म्हणजे – रानातील माणूस. मलायी लोक ओरांगउटांगबाबत एक कथा सांगतात. पूर्वी म्हणे तो माणूस होता व इतर सर्व माणसांप्रमाणे खेड्यात रहायचा. मग त्याला काम करावेसे वाटेना आणि रानात झाडांवर रहायला तो निघून गेला. त्याच्या शरीरावर तांबूस केस उगवले व तो माकड बनला.



06-Jul-13 / 02:34:39

# वानरे

हे आनंदी, विचित्र प्राणी म्हणजे शेपूटवाली छोटी माणसे भासतात. म्हाताऱ्यांप्रमाणे ह्यांची तोंडे सुरकुतलेली. काळे हातसुद्धा माणसांप्रमाणे. पाय – लांब बोटांच्या हातांसारखे. त्यांनी वानरे खाजवतात, हवी ती वस्तू हिसकावून घेतात आणि मारामारी करतात. आख्खा दिवस वानरे झाडांवरून भटकत असतात. ओरडतात, मारामारी करतात, एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर झोके घेतात. भाजीपाल्याच्या वाफ्यावर अशा आनंदी कळपाची धाड म्हणजे महासंकट! सगळे काही उपटून टाकतील, उध्वस्त करतील. खाण्यापेक्षा नासधूस जास्त करतील.



06-Jul-13 / 02:34:41



## सुसर

उबदार पाण्यात सुसर छानपैकी ऊन खात पडली आहे. सुळकेदार दातांचा जबडा तिने मिटलाय, कंगोरेदार शेपूट मुळीच हलवत नाही. जणू पाण्यात जिवंत जनावर नव्हे तर लाकडाचा खुंट पडलाय असे भासते.

सुसर पाण्यात ऐन किनाऱ्यापाशी पडून राहते आणि भक्ष्याची वाट पाहते. पाणी पिण्यासाठी झेब्रा अथवा हरण येईल – सुसर त्या जनावराला ताकदवान शेपटीचा तडाखा मारील, त्याला खाली पाडील, अणकुचीदार दातांच्या जबड्यात पकडील आणि पाण्याच्या तळाशी खेचून नेईल.




06-Jul-13 / 02:34:43




06-Jul-13 / 02:34:44



06-Jul-13 / 02:34:45





## समुद्रघोडा

समुद्रघोडा लठ्ठ, वजनदार असतो. जणू चरबीसकटचे प्रचंड कातडी पोते.

त्याच्या राठ मिशांमधून दोन बळकट पांढरे सुळे डोकावत असतात. समुद्रघोड्याला पायांऐवजी कल्ले असतात. त्या कल्ल्यांचा वल्ह्यांसारखा उपयोग तो करतो.

पाण्यात खोल बुडी मारून समुद्राच्या तळाशी तो चरतो, जशी गाय कुरणावर चरते. पाणवनस्पती चघळतो, शिंपल्या शोधतो आणि जेव्हा पोटभर चरतो, तेव्हा पाण्यावरती येतो, स्वतःचे सुळे रोवून हिमखंडावर अथवा किनाऱ्यावर चढतो व पाण्यातून पूर्णपणे बाहेर पडून खडकावर निजून विश्रांती घेतो.

06-Jul-13 / 02:34:46



## पांढरे अस्वल

पांढरे अस्वल हे भटके जनावर आहे. त्याची केसाळ कातडी उबदार आहे, त्याला थंडी बाधत नाही. दाट लोकर पाण्यात ओली होत नाही. थोडक्यात त्याला गोठवणाऱ्या थंडीची, हिमवादळाची, जोरदार वाऱ्याची, बर्फाळ पाण्याची मुळीच पर्वा वाटत नाही.

बर्फावरून, हिमावरून पांढरे अस्वल भटकत असते. मासा अथवा समुद्रघोड्याचे पिलू यांना भक्ष्य म्हणून पकडते, खाऊन टाकते व तावडतोब तेथेच बर्फावर झोपी जाते.

झोप झाली म्हणजे पुन्हा भटकू लागते. कुणाला पकडावे, पोटात नवीन काय ढकलावे, ह्याचा विचार करीत न्याहाळत, हुंगत ते फिरते. पाण्यात ते चपळपणे डुबकी मारते, वेगाने धावते, सहज पोहते. त्यामुळे ते फार काळ उपाशी रहात नाही, स्वतःसाठी हमखास भक्ष्य मिळविते.

06-Jul-13 / 02:34:48



06-Jul-13 / 02:34:49



## गेंडा

रानात काटक्या कडकड मोडतात, झाडे डोलतात व थरथरतात. उष्ण कटिबंधातील जंगलातून प्रचंड पशू आंधळेपणाने थेट चाललाय – गेंडा. काटे, कडक फांद्या, झाडांचे खुंट यांची त्याला पर्वा नाही. चिलखताप्रमाणे त्याची कातडी जाड आणि टणक आहे: भाला तिच्यात घुसणार नाही, बाण मोडून पडतो. केवळ बंदुकीची गोळी अशा कातडीमधून आत घुसू शकते.

गेंड्याच्या नाकावर मोठे शिंग असते, त्याचे डोळे अगदी लहान, अधू असतात. त्याला नीट दिसत नाही. क्षणाचा विचार न करता तो समोर धडक मारतो.

अत्यंत तापट स्वभावाचे आणि अविश्वासू जनावर.

06-Jul-13 / 02:34:50



06-Jul-13 / 02:34:51

# रेनडिअर

उत्तरेत सर्वत्र बर्फ आणि हिम पसरलेले असते व उन्हाळा अगदी लहान असतो. तिथे गवतकापणी करता येत नाही, हिवाळ्यात गायीला अथवा घोड्याला चारा घालता येत नाही. फक्त उत्तरेतील सांबर – त्याला रेनडिअर म्हणतात – तेथे जगू शकते. ते स्वतःच्या खुरांनी बर्फ उकरते आणि शेवाळ खाते.

उत्तरेतील माणूस कुणाचे दूध पितो? रेनडिअरचे.

कशावर बसून जातो? रेनडिअरच्या घसरगाडीवरून.

कुणाचे मांस खातो? रेनडिअरचे.

त्या प्रदेशात रेनडिअरवाचून माणूस जगू शकणार नाही.



06-Jul-13 / 02:34:57



06-Jul-13 / 02:34:59



06-Jul-13 / 02:35:20



# रानामध्ये

06-Jul-13 / 02:35:22

## बॅजर

वसंताचा मोसम आला, बर्फ वितळू लागले. स्वतःच्या कोरड्या बिळातून बॅजर बाहेर पडला. अजून झोपाळलेला आहे. सुरसुरत्या नाकाचा, केसाळ, अधू दृष्टीचा. अस्वलाप्रमाणे तो सारा हिवाळा झोपला होता. त्याच्या कुशीवरच्या केसांचा गुंता बनलाय. बॅजर अंग ताणतो, केस स्वच्छ करतो.

बॅजर शिकारीला निघाला – बेडक्या पकडायला. झाडांच्या मुळांपाशी शेवाळात किडे पकडतो. खाऊन-पिऊन झाले – त्याच पावली परत घरी येतो, स्वतःच्या कोरड्या बिळात.



06-Jul-13 / 02:35:43



## खार

फांद्यांवरून उड्या मारायचा व शंकूची फळे फोडून चघळायचा खारीला कंटाळा आला. भुईफोड्या खायची तिला इच्छा झाली. एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर झेपावत, एका डहाळीवरून दुसऱ्या डहाळीवर उडी घेत ती झाडावरून जमिनीवर उतरली.

खारी ग खारी, तुला बऱ्या-वाईट भुईफोड्या माहीत आहेत ना? एक लक्षात ठेव, पांढऱ्या ठिपक्यांच्या सुंदर लाल भुईफोड्या खाऊ नकोस; त्या अत्यंत विषारी आहेत.

06-Jul-13 / 02:35:45



06-Jul-13 / 02:36:08



## सारस

शेवाळमाखल्या उंचवटयावर दलदलीत सारस पक्षी झोपेतून जागा झाला, चोचीने त्याने पिसे सारखी केली आणि मोठ्यांदा तो ओरडला: कूर्ली, कूर्ली!

वाटाण्याच्या झाडांवर वाटाणे वेचायला उडाला. खाऊन झाल्यानंतर नदीवर जाऊन पाणी प्यायला आणि स्वच्छ पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब बघू लागला. लांब पाय, बारीक मान, राखी रंगाची पिसे! सारसाने पंख पसरले आणि तो पाय आपटू लागला, नाचू लागला, गिरक्या मारू लागला, पाण्यात स्वतःला बघू लागला.

06-Jul-13 / 02:36:21



## रानडुकर

हे जंगली डुकर – ह्याला रानडुकर म्हणतात.

फुरफुर आवाज करीत ते रानातून भटकते. ओकची फळे वेचतेय. स्वतःच्या लांब मुसकटाने जमीन उकरते. स्वतःच्या वाकड्या सुळ्यांनी मुळे खणते, त्यांना उपटून खाद्य शोधते.

रानडुकर स्वतःच्या सुळ्यांनी झाडाला कुऱ्हाडीप्रमाणे फोडते, लांडग्याला ठार मारते. जणू तलवारीप्रमाणे सुळे लांडग्याच्या शरीरात खुपसते. खुद्द अस्वलसुद्धा रानडुकराला घाबरते.



06-Jul-13 / 02:36:47





06-Jul-13 / 02:36:48

## रानमांजर

अंधाऱ्या रानात रानवाटेवर एक जनावर आडवे पडून आहे. मोठ्या कुत्र्याच्या उंचीएवढे हे रानमांजर आहे. त्याची शेपूट आखूड, कान झुबकेदार, केसाळ कातडीवर ठिपके. जाडजूड फांदीवर निजून रानमांजर वाट पाहतेय. ह्या झाडांखालून जाऊ नको – त्याच्या नख्यांमध्ये सापडशील. ते थेट झाडावरून भक्ष्यावर झेप मारील!



06-Jul-13 / 02:37:02



06-Jul-13 / 02:37:05

## अस्वल

गोडखाऊ अस्वल रास्बेरी खात बसलेय.
मचमच करतेय, ओठ चाटतेय, आनंदाने ढेकरा देतेय. केवळ एकेक फळ तोडत नाही, तर आख्खे झुडुप गट्ट करतेय – फक्त भुंड्या फांद्या उरतात.

अस्वला, तू बेटया आधाशी आहेस! महाखादाड!

सांभाळ, अतिखाण्यामुळे पोट दुखेल!



06-Jul-13 / 02:37:18



06-Jul-13 / 02:37:20



06-Jul-13 / 02:37:22



## कोल्हा

कोल्हा हिवाळ्यात उंदीर पकडतो. दूरचे दिसावे म्हणून खुंटावर बसतो, कानांनी चाहूल घेतो, सभोवार पाहतो: बर्फाखाली उंदीर कुठे चीं चीं आवाज करतो, बर्फ कुठे किंचित हलते?

आवाज आला, बर्फ हललेले दिसले की, तात्काळ झेप घेतो.

सापडला: तांबूस केसाळ शिकाऱ्याच्या दातांमध्ये उंदीर सापडला!

06-Jul-13 / 02:37:24

## ससा

सशाचे कातडे खूप उबदार आणि पांढरेशुभ्र आहे. सशाचे कातडे सशाला थंडीपासून बाचवते आणि शिकाऱ्यापासून लपवते. बर्फ पांढरे आणि ससासुद्धा पांढरा. कसा दिसणार तो! त्याला निरखून पाहीपर्यंत ससा शिकाऱ्याला गुंगारा देऊन पळ काढतो.

ससा फांद्या ओरबाडतो आणि कडू साल खातो. उबदार उन्हाळ्याची वाट पाहतो. कारण उन्हाळ्यात तऱ्हेतऱ्हेचे खाणे भरपूर मिळते. गोड क्लोव्हर, चवदार गवत, मधाळ फुले.

मात्र ससोबा, आमच्या वाफ्यावर धाड घालू नको, कोबी कुरतडू नको, आमची गाजरे नासवू नको.



06-Jul-13 / 02:37:26



## घुबड

घुबडाची पिसे मऊ असतात, त्याच्या पंखांचा आवाज होत नाही – सळसळत नाहीत, फडफडत नाहीत ; घुबडाच्या नख्या बाकड्या, धारदार असतात. अशा नख्यांमधून कुणीही सुटू शकत नाही – ना उंदीर, ना खार, ना झोपाळलेला पक्षी. घुबड रात्रीच्या वेळांना शिकार करते, दिवसा झोपते.

दोन निळी पाखरे रानातून उडत होती, फांद्यांमधून बागडत होती आणि एकदम त्यांना घुबड दिसले. त्यांनी आरडाओरडा केला: "ए पक्ष्यांनो, इकडं या! हा बघा, हा बघा, रात्रीचा दरोडेखोर, बटबटीत डोळ्यांचा, हा बघा बसलाय!"

06-Jul-13 / 02:37:27

## साळिंदर

पोरे रानात भटकत होती तेव्हा झुडुपाखाली त्यांना एक साळिंदर सापडले. साळिंदराने घाबरून स्वतःच्या अंगाला मिटवून चेंडू बनविला. त्याला हातात उचलून तर बघा – सगळीकडे सुया लोंबताहेत. साळिंदराला एका टोपीत ढकलून मुलांनी घरी आणले. त्याला फरशीवर सोडले आणि त्याच्यासमोर बशीत दूध ठेवले.

पण साळिंदर चेंडू बनून बसले होते, मुळीच हलत नव्हते.

तासभर ते तसे पडून राहिले आणि आणखी आख्खा एक तास.

मग काट्यांमधून साळिंदराचे काळे नाक बाहेर डोकावले आणि ते जागचे हलले.

असा चवदार वास कशाचा येतोय?

साळिंदराने शरीर ताठ केले, दूध पाहताच ते पिऊ लागले. दूध पिऊन संपल्यानंतर पुन्हा त्याने मुटकुळी मारून अंगाचा चेंडू बनवला.

मग मुले दुसऱ्या उद्योगात गुंतली, साळिंदराकडे त्यांनी दुर्लक्ष केले. साळिंदर पुन्हा रानात पळून आले.



06-Jul-13 / 02:37:29



## लहान विषारी साप

सूर्य वातावरण तापवू लागला. झाडांच्या ओलसर मुळांखालून, थंड शेवाळाखालून लहान विषारी साप सरपटत बाहेर पडला. तापलेल्या बुंध्यावर चढला व पडून राहिला. उन्हात शेक घेत होता, मुळीच हालचाल करीत नव्हता. ह्या सापाचे दात विषारी आहेत – ज्या जनावराला चावेल ते जनावर मरून पडेल. त्या मेलेल्या जनावराला साप गट्ट करील.

रानात अनवाणी धावू नको, नाही तर लहान विषारी साप तुला चावेल – त्याच्या विषामुळे खूप दिवसपर्यंत आजारी पडशील.

06-Jul-13 / 02:37:31



## सुतारपक्षी

रानात एवढ्या मोठ्याने ठोकाठोक कुणी चालवलीय? कोण हा पडघम वाजवणारा? हा बघा – रंगीबेरंगी पिसांचा आणि लाल टोपीवाला. पाईनच्या झाडावर उडत आला, सालीत नख्या खुपसून बसला, खाली शेपूट रेटून आधार घेतला व उड्या मारीत बुंध्यावर चढला. सालीखाली अळ्या होत्या ती जागा त्याने शोधून काढली, पुन्हा चोचीने ठोकू लागला – तर्रर्र, तर्रर्र… अळ्या खाल्ल्या, पुढे उडाला, पुन्हा सालीवर ठोकू लागला – तर्रर्र… खूप दूर उडाला, अजून त्याचा आवाज ऐकू येतोय – तर्रर्र… जणू पडघमवर टिपरी वाजवत होता. आत्ता मला समजले की, हा [illegible]क्षी आहे.

06-Jul-13 02:37:33

## रानकोंबडा

हा रानकोंबडा खूप सुंदर आहे. डौलदार तिरपी शेपूट, अंगभर काळी पिसे, लाल लाल भुवया, पाय आखूड आणि हिवाळ्यात गोठू नयेत म्हणून जणू केसाळ लांब बूट घातल्याप्रमाणे सर्व पाय पिसांनी झाकलेले.

हिवाळ्यात तो भोजाच्या झाडावर बसतो, भोजाच्या लोंबत्या फुलांवर चोची मारतो आणि झोपायची इच्छा झाली म्हणजे डोके खाली पाय वर अशा अवस्थेत बर्फात धप्पकन उडी घेतो. बर्फात एक-दोन वेळा अंग घुसळतो, छोटा खळगा बनवितो आणि सारी रात्र त्यात झोपतो. वसंतात रानकोंबडे रानातील उघड्या मैदानांवर गोळा होतात. तेव्हा त्यांच्या प्रेमाचा हंगाम असतो. एकमेकांवर उड्या मारतात, झुंजी खेळतात, गाणी गातात. कुणी आपल्या ओरडण्याने सारे रान दणाणून टाकतो, तर कुणी कबूतराप्रमाणे घुमत राहतो.



06-Jul-13 / 02:37:35

## लांडगा

सांभाळा, मेंढवाडचातील मेंढचांनो, डुकरवाडचातील डुकरांनो, सांभाळा, वासरांनो, शिंगरांनो, घोडचांनो, गायींनो!

दरोडेखोर लांडगा शिकारीला बाहेर पडलाय.

कुत्र्यांनो, मोठचांदा भुंका – लांडग्याला घाबरवा!

सामुदायिक शेताच्या पहारेकऱ्या, तुझ्या बंदुकीत गोळ्या ठास!



06-Jul-13 / 02:37:37



06-Jul-13 / 02:37:38



06-Jul-13 / 02:37:40

# आपल्या अंगणात



06-Jul-13 / 02:37:42



06-Jul-13 / 02:37:44



## कुत्रा

शारीक दाट केसाळ उबदार कातडीचा आहे. सारा हिवाळा तो गोठलेल्या थंडीत राहतो. त्याच्या घरात शेकोटी नाही— फक्त कुत्र्याचे घर, तेथे गवती बिछाना, पण त्याला थंडी वाजत नाही. शारीक भुंकतो, सामुदायिक शेताची राखण करतो, वाईट लोकांना आणि चोरांना दारामधून आत सोडत नाही, म्हणून सर्वांना तो आवडतो आणि त्याला पोटभर खाऊ घालतात.

06-Jul-13 / 02:37:45

# मांजरी

ही माऊस्या मांजरी. तिने तळघरात उंदीर पकडला म्हणून तिच्या मालकिणीने तिला दूध पाजले. माऊस्या गालिचावर भरल्या पोटाने समाधानाने बसलीय. गुरगुरत गाणी गातेय. तिचे पिलू लहान आहे – त्याला गुरगुरण्यात गंमत वाटत नाही. ते स्वतःशी खेळतेय – स्वतःची शेपूट पकडतेय, सर्वांवर पिस्कारतेय, मिशा पिंजारतेय.



06-Jul-13 / 02:37:47



## ससा

ही सशीण आहे. तिला दोन पिले आहेत – ती आईसारखीच दिसतात, फक्त लहान आहेत. लांब कान, आखूड शेपट्या, गोल डोळे आणि आईप्रमाणेच गवत खातात. थेट आईसारखी आहेत. सशाचे पिलू गवत चघळतेय, सारे तोंड हलतेय, नाकाची उघडझाप चाललीय, तोंडातून गवत हळूहळू नाहीसे होतेय. गवत संपले – सशाचे पिलू पुन्हा गवत तोडते व चघळू लागते. त्यांच्यासाठी मी गाजर, कोबीचे पान आणि पावाचे कवच आणतो – बघाल चघळोत.

06-Jul-13 / 02:37:49



## डुकरीण

ही हावरोन्या सुंदरी – चिखलात लडबडलेली, डबक्यात डुंबलेली, कुशीवर आणि मुसकटावर चिखलाचे डाग पडलेली.

"हावरोन्या लाडके, नदीवर जा, चिखल धुवून काढ. नाही तर डुकरवाड्यात जा, तिथं तुला धुवून पुसून स्वच्छ करतील."

"ख्यु – ख्यु," ती म्हणते.

"जाणार नाही, मला इथंच छान वाटते!"

06-Jul-13 / 02:37:50



06-Jul-13 / 02:37:52



## उंट

उंट वाळवंटातून चालत होता. पाठीवरून जड ओझी वाहात होता. खूप दमला, रोडावला; शेवटी विश्रांती-साठी त्याला घरी आणले. पाय मुडपून तो बसलाय. गवत, कडबा चघळतोय. मात्र तू त्याला डिवचू नको, नाही तर रागावून तो तुझ्यावर थुंकेल.





06-Jul-13 / 02:37:53



06-Jul-13 / 02:37:54



## गाय

कपिला गाय हिरव्या कुरणात उभी आहे, गवत रवंथ करतेय. कपिलेची शिंगे बाकडी आहेत, कूस लठ्ठ आहे, आचळ दुधाने भरलेले आहेत. ती शेपटी उडवतेय : माशा उडवतेय.

"कपिले, तुला रवंथ करायला काय आवडतं – साधं हिरवं गवत किंवा वेगवेगळी फुलं? डेझी, किंवा रानफूल, अथवा हिरवा बाटाणा, अथवा नीलपुष्पी, अथवा घंटासुर? खा, खा कपिले, जास्तीत जास्त चवदार खा, म्हणजे तुझं दूध जास्त गोड बनेल. गवळण तुझं दूध काढायला येईल, बादलीभर चवदार, गोड दूध काढील."



06-Jul-13 / 02:37:56





06-Jul-13 / 02:37:58

## बदक

बदक तळ्यात बुडया मारतेय, आंघोळ करतेय, स्वतःची पिसे चोचीने स्वच्छ करतेय. पिसे सपाट रहावीत म्हणून चोचीने त्यांना विंचरते आहे. पिसांना विंचरून, स्वच्छ करून आरशात पहावे तसे पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहते – अहा, किती सुंदर! आणि ओरडते: "क्वा – क्वा – क्वा – क्वा!"



06-Jul-13 / 02:38:01



## कोंबडी

कोंबडी स्वतःच्या पिलांबरोबर अंगणात फिरत होती. अचानक पाऊस पडू लागला. कोंबडी पटकन जमिनीवर बसली, तिने सर्व पिसे फुलवली आणि ती ओरडू लागली: "क्वॉक – क्वॉक – क्वॉक – क्वॉक!" म्हणजे: "लपा लौकर!" सर्व पिले तिच्या अंगाखाली, उबदार पिसांखाली लपली. कुणी पूर्ण लपले, कुणाचे पाय दिसत होते, कुणाचे डोके तर कुणाचा फक्त डोळा दिसत होता.

पण दोन पिलांनी आईचे ऐकले नाही व ती लपली नाहीत. उभी राहून थरथर कापत आहेत आणि मनाशी आश्चर्य करताहेत: आमच्या डोक्यावर ही कसली टपटप चाललीय?

06-Jul-13 / 02:38:03


# घोडा

हा उमदा घोडा कुरणावर धावतोय, मोठ्यांदा खिंकाळतोय, टापांनी जमीन तुडवतोय. अजून कुणीही त्याच्यावर खोगीर चढवलेले नाही, गाडीला त्याला जुंपलेले नाही. तो स्वतंत्र वाढतोय, ताकद एकवटतोय. त्याचा खरारा करतात आणि त्याला खाऊ घालतात – नव्या मालकासाठी तयार करतात.

मालक छान असेल. अशा घोड्याला ओझी वाहाय-ला जुंपत नाहीत. क्रीडास्पर्धांमध्ये असा घोडा भाग घेतो, सर्वांपुढे धावतो.



06-Jul-13 / 02:38:05



06-Jul-13 / 02:38:06



## मेंढा

ओहो, किती बाकड्या शिंगांचा आणि नरम! हा छान मेंढा आहे, साधासुधा नव्हे. ह्याची लोकर दाट आहे, ह्याचे केस खूप पातळ आहेत. ह्याच्या लोकरीपासून छान हातमोजे, स्वेटर, मोजे विणता येतात. पूर्ण पोषाख आणि उंच बूट बनविता येतात. सारे काही उबदार असेल. सामुदायिक शेतावर अ[illegible]हे.

06-Jul-13 / 02:38:08

## बकरी

बकरी रस्त्यावरून घाईघाईने घराकडे चाललीय. घरी मालकीण तिला खाऊ-पिऊ घालील. जर मालकिणीने दुर्लक्ष केले, तर बकरी स्वतःच स्वतःची काळजी घेईल. फडताळातील केरसुणी चघळेल, स्वयंपाकघरात पावाचा तुकडा उचलेल, परसदारच्या वाफ्यात कोवळे कोंब खाईल, बागेत सफरचंदाच्या झाडाची साल ओरबाडेल. अशी आहे ही निर्लज्ज बकरी! पण बकरीचे दूध गायीच्या दुधापेक्षा जास्त चवदार असते.



06-Jul-13 / 02:38:09



## विलायती कोंबडा

अंगणात विलायती कोंबडा छाती फुगवून फिरतोय, सर्वांवर तो चिडलाय. जमिनीवरून पंख फरफटत नेतोय आणि त्याने शेपूट फुलारलीय. मुले जवळून जाताना त्याला चिडवू लागली:

"कोंबड्या, कोंबड्या दाखव तोरा!
अंगणभर मिरव तुझा तुरा!"

विलायती कोंबड्याने चिडून आणखीच छाती फुगवली व तो ओरडला:

"आ – बू – बू – बू – बू – बू!"

असा आहे घमेंडखोर बटवट्या!

06-Jul-13 / 02:38:10

# हंस

हंसाने एव्हाना आंघोळ केली होती. तो कुरणावर चरायला गेला.

अरे पांढऱ्या शुभ्र हंसा,
फूल तोडू नको,
गवत तोडू नको,
माझ्यापाशी ये.
पावाचा चुरा तुला मी देईन,
धान्याचे दाणे भरपूर शिंपडीन,
मात्र चोच नको मला मारू !



06-Jul-13 / 02:38:12

## गाढव

गाढवाला काटेरी झाडांमध्ये बांधून ठेवले होते. काटेरी झाडे म्हणजे गाढवाला पक्वान्न. जवळची सर्व काटेरी झाडे त्याने फस्त केली, पण सर्वांत चवदार झाडे त्याला खाता येईनात: दोरी आखूड होती. तेव्हा गाढव मोठ्यांदा ओरडले:

"ई – आ! ई – आ! ई – आ!"

त्याचा आवाज भसाडा होता, वाईट होता. पाच किलोमीटरपर्यंत ऐकू जात होता. अरे मालका, लौकर ये आणि गाढवाला दुसऱ्या जागी बांध. चरता येण्याजोग्या.



06-Jul-13 / 02:38:14



06-Jul-13 / 02:38:15

Е. Чарушин

МОЯ ПЕРВАЯ ЗООЛОГИЯ

*На языке маратхи*

Ye. Charushin

MY ANIMAL BOOK

*In Marathi*





© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९९०

सोवियत संघात मुद्रित

06-Jul-13 / 02:38:17